# MAHARASHTRA ACT XLIX OF 1965

## THE AMBERNATH INTERIM MUNICIPALITY (CONSTITUTION AND ACTIONS) VALIDATION ACT, 1965.

महाराष्ट्र विधान मंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १० डिसेंबर १९६५ रोजी मिळालेली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XLIX OF 1965

## AN ACT TO VALIDATE THE CONSTITUTION OF AN INTERIM MUNICIPALITY FOR AMBERNATH MUNICIPAL DISTRICT AND TO MAKE CERTAIN CONSEQUENTIAL PROVISIONS UPON CONVERSION OF VILLAGE PANCHAYAT INTO A MUNICIPALITY

## सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक १४ डिसेंबर १९६५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

**अंबरनाथ नगरपालिका जिल्ह्याकरिता स्थापन केलेली मध्यंतरीय नगरपालिका वैध ठरविणे आणि ग्रामपंचायतीचे नगरपालिकेत रूपांतर केल्यानंतर विवक्षित आनुषंगिक तरतुदी करणे, याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (सन १९०१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) याच्या कलम ४ अन्वये स्थानिक स्वराज्य व सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक ६ मे १९६५ रोजी काढलेली सरकारी अधिसूचना क्रमांक डी. टी.एम्. २५५३.ए. यान्वये राज्य सरकारने विवक्षित खेड्यांच्या हद्दीतील जे स्थानिक क्षेत्र सदरहू अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात आले आहे ते स्थानिक क्षेत्र दिनांक ११ मे १९५९ पासून अंबरनाथ नगरपालिका जिल्हा या नावाखाली कायम नगरपालिका जिल्हा असल्याचे जाहीर केले आहे ;

आणि ज्याअर्थी सन १९५९ चा मुंबईचा अधिनियम क्रमांक ८ अन्वये (हा अधिनियम दिनांक १३ मार्च १९५९ पासून अंमलात आला) उक्त जिल्हा नगरपालिका अधिनियमाच्या कलम १९१-ब मध्ये दुरुस्ती करण्यापूर्वी ते कलम ज्या स्वरूपात होते त्याच्या आधाराव्र ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून आपले पद रिकामे करणाऱ्या इसमांची सदस्य म्हणून व ग्रामपंचायतीचे सरपंच व उपसरपंच यांची त्या नगरपालिकेचे अनुक्रमे अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून दिनांक ११ मे १९५९ पासून नव्याने निर्माण केलेल्या नगरपालिका जिल्ह्यासाठी एका मध्यंतरीय नगरपालिकेची रचना केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ यान्वये दुरुस्त केलेल्या उक्त जिल्हा नगरपालिका अधिनियमाच्या कलम १९१-ब अन्वये नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक ९ जून १९६० रोजी काढलेली सरकारी अधिसूचना क्रमांक डीटीएम्.२५५३/ए यान्वये राज्य सरकारने ग्रामपंचायतीच्या त्याच सदस्यांना मध्यंतरीय नगरपालिकेचे सभासद म्हणून व तिच्या सर-

पंचास व उप-सरपंचास मध्यंतरीय नगरपालिकेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून दिनांक ११ मे १९५९ पासून ते ज्या तारखेस निवडणुका घेण्यात आल्या त्या तारखेपर्यंत भूतकालसापेक्ष नामनिर्दिष्ट केले आहे आणि उक्त तारखेपासून ग्रामपंचायतीची मालमत्ता, हक्क व जबाबदाऱ्या नगरपालिकेकडे निहित केल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, त्यानंतर सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली होती व त्यात निवडून आलेल्या सभासदांची पहिली सर्वसाधारण सभा दिनांक १९ मार्च १९६१ रोजी घेण्यात आली होती;

आणि ज्याअर्थी, मध्यंतरीय नगरपालीकेच्या सभासदांनी १८ मार्च १९६१ ही तारीख धरून त्या तारखेपर्यंत आपल्या पदावर असण्याचे चालू ठेवले;

आणि ज्याअर्थी, सदरहू स्थानिक क्षेत्र नगरपालिका जिल्हा असल्याचे जाहीर केल्याबरोबर राज्य सरकारने, सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याद्वारे दुरुस्त केलेले उक्त जिल्हा नगरपालिका अधिनियमाचे कलम १९१-अ यान्वये आवश्यक असलेला आदेश काढला नव्हता केवळ याच कारणावरून मध्यंतरीय नगरपालिकेच्या रचनेच्या वैधतेसंबंधी आणि त्या क्षेत्रात अंमलात असलेल्या नेमणुका, अधिसूचना, कर, नियम, उपविधी आणि इतर बाबी चालू ठेवण्यासंबंधी शंका उपस्थित झाल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, अशा शंकांचे निरसन करण्याकरिता तरतूद करणे, आणि मध्यंतरीय नगरपालिकेची रचना व त्या नगरपालिकेने केलेली कारवाई किंवा केलेल्या गोष्टी वैध ठरविणे व उपरोक्त प्रयोजनांशी संबंधित असलेल्या बाबींसंबंधात तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, आता, भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त संज्ञा व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास अंबरनाथ मध्यंतरीय नगरपालिका (रचना व कार्ये) वैधकरण अधिनियम, १९६५ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १५ ऑक्टोबर १९६५ रोजी अंमलात आला असल्याचे समजण्यात आले पाहिजे.

व्याख्या.

२. संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "नेमलेला दिवस" म्हणजे दिनांक ११ मे १९५९;

(ब) "पंचायत" म्हणजे नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी अंबरनाथ नगरपालिका जिल्ह्यात समाविष्ट असलेल्या क्षेत्रावर क्षेत्राधिकार असलेली ग्रामपंचायत.

अंबरनाथ-करिता मध्यंतरीय नगर-पालिकेची भूतकालसापेक्ष रचना करणे, आणि ग्राम-पंचायतीचे नगरपालिकेत रूपांतर केल्यासंदर्भात आनुषंगिक उपबंध.

३. मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही विधी यात काहीही असले तरी,—

(अ) नेमलेल्या दिवसापासून सुरू होणाऱ्या व दिनांक १८ मार्च १९६१ रोजी संपणाऱ्या मुदतीकरिता अनुसूचीत निर्दिष्ट केल्याप्रमाणे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि इतर बारा सभासद यांचा समावेश करून अंबरनाथ नगरपालिका जिल्ह्यासाठी अंबरनाथ नगरपालिका या नावाच्या एका मध्यंतरीय नगरपालिकेची नेमलेल्या दिवशी योग्यरीतीने रचना करण्यात आल्याचे समजण्यात येईल आणि अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सर्व सभासद यांची उक्त मुदतीकरिता योग्यरीत्या नेमणूक करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल;

(ब) पंचायतीची सर्व मालमत्ता, हक्क व जबाबदाऱ्या (यात, पंचायतीने केलेल्या कोणत्याही कराराखालील हक्कांचा आणि जबाबदाऱ्यांचा समावेश होतो) ह्या नेमलेल्या दिवशी अंबरनाथ नगरपालिकेकडे हस्तांतरित केल्याचे समजण्यात येईल व त्या नगरपालिकेकडे निहित होतील आणि नेमलेल्या दिवसापासून अशी मालमत्ता, हक्क व जबाबदाऱ्या ह्या अंबरनाथ नगरपालिकेची मालमत्ता, हक्क व जबाबदाऱ्या होतील;

(क) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी, जर पंचायत कोणत्याही वैध कार्यवाहीतील पक्षकार असेल तर, त्याबाबतीत, तिच्याऐवजी अंबरनाथ नगरपालिका पक्षकार असल्याचे समजण्यात येईल;

आणि पंचायत किंवा तिच्या अधीन असलेला कोणताही प्राधिकारी किंवा अधिकारी याजसमोर असलेली कोणतीही कार्यवाही अनिर्णित असेल तर, अशी कार्यवाही त्या नगरपालिकेकडे किंवा तिच्या तत्सम प्राधिकाऱ्याकडे किंवा अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करण्यात आल्याचे समजण्यात येईल, व ती त्याप्रमाणे चालू ठेवण्यात येईल ;

(ड) नेमलेल्या दिवसापासून पंचायतीच्या सर्व कर्मचाऱ्यांची नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी सेवेच्या ज्या शर्ती व अटी त्यांना लागू होत्या त्याच अटींवर व शर्तीवर, अंबरनाथ नगरपालिकेकडे बदली करण्यात आल्याचे समजण्यात येईल, आणि अशा अटी व शर्तीमध्ये राज्य सरकारची पूर्वमंजुरी घेतल्याशिवाय त्याना लाभदायक ठरणार नाही अशा रीतीने बदल करता कामा नये ;

(इ) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी, पंचायतीने किंवा पंचायतीच्या बाबतीत केलेल्या सर्व नेमणुका नियम, उपविधी किंवा नमुने, काढलेल्या अधिसूचना, नोटिसा व आदेश, बसविलेले कर, किंवा मंजूर केलेल्या योजना, लायसेन्से, परवाने व पंचायत क्षेत्रात अमलात असलेल्या अशा सर्व गोष्टी ह्या, सक्षम प्राधिकाऱ्याकडून निष्प्रभावित करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत त्या दिवसापासून अंबरनाथ नगरपालिका जिल्ह्यात अंमलात असल्याचे समजण्यात येईल ;

(फ) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी, पंचायतीने केलेले किंवा तिच्या संबंधात करण्यात आलेले किंवा तिने अभिप्रमाणित केलेले किंवा तिच्या संबंधात अभिप्रमाणित करण्यात आलेले आणि पंचायतीच्या क्षेत्रात अंमलात असलेले सर्व अर्थसंकल्पीय अंदाज, आकारण्या, आकारणीच्या याद्या, मूल्य निर्धारणे, मोजमापे किंवा विभागण्या ह्या, सक्षम प्राधिकाऱ्याकडून निष्प्रभावित करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत त्या दिवसापासून अंबरनाथ नगरपालिका जिल्ह्यात अंमलात असल्याचे समजण्यात येईल.

४. अंबरनाथ नगरपालिका जिल्ह्याच्या मध्यंतरीय नगरपालिकेने किंवा अशी मध्यंतरीय नगरपालिका म्हणून रचना केल्याचे अभिप्रेत असलेल्या इसमांनी किंवा मंडळाने किंवा मध्यंतरीय नगरपालिकेच्या अध्यक्षाने किंवा उपाध्यक्षाने किंवा तिच्या सभासदाने किंवा नगरपालिकेचा कोणताही प्राधिकारी किंवा अधिकारी किंवा कर्मचारी याने किंवा अशा मंडळाने मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या उपबंधानुसार किंवा तदन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करताना किंवा वापर केल्याचे अभिप्रेत असताना किंवा त्यांच्याकडे सोपविलेली कर्तव्ये पार पाडताना, केलेली किंवा करावयाची राहून गेलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही ही वैधरित्या केली गेली असल्याचे किंवा करण्याचे राहून गेली असल्याचे मानले जाईल व ज्या वेळी अशी गोष्ट किंवा वजन करण्यात आले किंवा अशी कार्यवाही करण्यात आली त्यावेळी मध्यंतरीय नगरपालिकेची योग्यरीत्या रचना करण्यात आलेली नव्हती, अथवा सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ अन्वये दुरुस्ती करण्यात आलेले मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ चे कलम १९१-ब या अन्वये त्यात निर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबीसंबंधी राज्य सरकारने कोणताही आदेश दिला नव्हता अथवा दिलेला असा कोणताही आदेश प्रभावी नव्हता. केवळ याच कारणावरून त्यावर कोणत्याही न्यायालयात हरकत घेता येणार नाही. वैधकरण

५. अंबरनाथ मध्यंतरीय नगरपालिका (रचना व कार्य) वैधकरण अध्यादेश १९६५ हा या द्वारे रद्द करण्यात येत आहे. सन १९६५चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४ रद्द करणे.

## अनुसूची

(कलम ३ पहा)

| अनुक्रमांक | नाव | मध्यंतरीय नगरपालिकेतील पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. कोरे, डी. ए. | अध्यक्ष. |
| २ | श्रीमती सरदार, शशिकला विष्णू | उपाध्यक्ष. |
| ३ | श्री. कर्णिक, एन्. टी | सभासद. |
| ४ | श्री. वझे, डी. डी. | ,, |
| ५ | श्री. शिंदे, एस्. एल्. | ,, |
| ६ | श्री. अडांगळे, डी. एस्. | ,, |
| ७ | श्री. चव्हाण, वाय्. एम्. | ,, |
| ८ | श्री. जाधव, पी. के. | ,, |
| ९ | श्री. कानडी, टी. एल्. | ,, |
| १० | श्री. लिंगायत, सी. एस्. | ,, |
| ११ | श्री. भोईर, एस्. वी. | ,, |
| १२ | श्री. कांबळे, आर्. डी. | ,, |
| १३ | श्री. मदनसिंग मनीवीरसिंग | ,, |
| १४ | श्रीमती कारखानीस, इंदिराबाई द्वारकानाथ | ,, |

(यथार्थ अनुवाद)

**वा. ना. पंडित,**
भाषा संचालक,
महाराष्ट्र शासन.